# 'विवेकानंद'मध्ये अभ्यास मंडळाचे उद्घाटन

कोल्हापूर, ता. १४ : विवेकानंद महाविद्यालयात विद्यार्थी इतिहास मंडळाचे उद्घाटन, भित्तीपत्रकाचे प्रकाशन माजी प्राचार्य डॉ. विलास पोवार यांच्या हस्ते झाले. अध्यक्ष शिवप्रसाद शेवाळे, उपाध्यक्ष प्रियंका पोवार, सचिव शिवतेज तालुगडे, चैतन्या टोमके यांची निवड झाली. डॉ. पोवार यांनी कोल्हापूर स्वातंत्र्य संग्रामाचा इतिहासावर मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. एस. आर. कट्टीमनी यांनी प्रास्ताविक केले. डॉ. मंजुश्री घोरपडे यांनी स्वागत केले. प्रियांका पोवारने सूत्रसंचालन केले. सायली परदेशीने आभार मानले.